# जय बजरंग विद्यालयात सायबर गुन्ह्याविषयी जागरूकता




◆ **अकोला,१८ जानेवारी**

आधुनिक तंत्रज्ञान वाढत असतांना देशात सायबर गुन्हेही वाढत आहेत. लोकांना याविषयी माहिती नसल्यामुळे ते काही प्रकरणात फसत आहेत व परिणामी अशा प्रकारचे गुन्हे होतांना दिसत आहेत.या विषयाची विद्यार्थ्यांमध्ये सुध्दा जागरुकता व्हावी याकरिता Quick Heal Foundation Pune Maharashtra Cyber Cell तर्फे Cyber Security -wareness कार्यक्रम नुकताच जवळच असलेल्या कुंभारी येथील जय बजरंग विद्यालयात शंकरलाल खंडेलवाल महाविद्यालय अकोला येथील भौतिकशास्त्र विभागाच्या वतीने संपन्न झाला.

कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य विलास इंगळे तर प्रमुख अतिथी म्हणून ज्येष्ठ शिक्षक सुनिल फोकमारे होते. कार्यक्रमाच्या मार्गदर्शिका शिवानी वगारे, सवी लोडम होत्या. कार्यक्रमाचे संचालन क्रीडा शिक्षक बी.एस.तायडे यांनी केले.

सायबर गुन्हा किंवा संगणकीय गुन्हा विशेष करून हॅकिंग, प्रताधिकारभंग, बाल लैंगिक चित्रण इत्यादी स्वरुपात घडतांना दिसतात. याशिवाय खाजगी किंवा गोपनीय माहिती चोरणे, फोडणे आदी प्रकार देखील सायबर गुन्ह्यांमध्ये मोडतात अशी माहिती याप्रसंगी देण्यात आली. माहिती तंत्रज्ञानाच्या प्रसाराबरोबर सायबर गुन्ह्यांमध्ये लक्षणीय वाढ होतांना आढळत आहे. या गुन्हांना आळा घालण्यासाठी त्यावरील उपाययोजनांची उपयुक्त माहिती शिवानी वगारे व सवी लोडम यांनी विद्यार्थ्यांना दिली.

कार्यक्रमाकरिता विद्यालयातील बहुसंख्य विद्यार्थ्यांसह सर्व शिक्षक तथा शिक्षकेतर कर्मचारी उपस्थित होते. ◀(तभा वृत्तसेवा)